# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अॅग्रोमेट अॅडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 09-06-2023**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये सावनेर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-06-09 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-06-10 | 2023-06-11 | 2023-06-12 | 2023-06-13 | 2023-06-14 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.3 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 40.7 | 40.7 | 40.4 | 37.1 | 38.3 |
| किमान तापमान (अं.से) | 25.5 | 26.1 | 25.0 | 24.5 | 25.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 32 | 31 | 40 | 39 | 42 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 18 | 17 | 21 | 25 | 25 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 13 | 16 | 14 | 17 | 13 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 285 | 293 | 248 | 283 | 290 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 5 | 2 | 3 | 3 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• तालुक्यामध्ये भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १० ते १४ जून २०२३ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १०, ११, १३ व १४ जून २०२३ खूप हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक १० व ११ जून २०२३ रोजी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक १३ व १४ जून २०२३ रोजी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • विदर्भामध्ये कमाल तापमानात पुढील ५ दिवसामध्ये फारसा बदल होणार नाही. • विदर्भामध्ये किमान तापमानात पुढील ४-५ दिवसामध्ये फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

• पाऊस, वादळी वारा व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • वाऱ्याचा वेग लक्षात घेता फळबागा व भाजीपाला पिकांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • पावसाळ्यात शेतातील पाणी जागेवरच मुरविण्यासाठी तसेच अवघावासोबत मौल्यवान मातीचा थर वाहून जाऊ नये म्हणून जमिनीची मशागत (नांगरणी, वखरणी) करताना मुख्य उतारला आडवी किंवा समतल रेषा काढून (कंटूर) या रेषेला समांतर करावी. • सद्यस्थितीमध्ये असणारे तापमान लक्षात घेता, उन्हाळी भाजीपाला पिकाचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी ग्रीन शेड नेटचा वापर करावा. • नवीन लागवड केलेल्या १ ते ४ वर्ष वयाच्या फळझाडांच्या आळ्यात पाला पाचोळा, गव्हांड्याचे आच्छादन करावे. लहान रोपांवर पऱ्हाटी किंवा तुऱ्हाटीचे छप्पर करावे. • वाढत्या तापमानाचा अंदाज लक्षात घेता, शेतीमधील महत्वाची कामे हि सकाळी ११ वाजता पूर्वी करण्यास प्राधान्य द्यावे. • माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते अधिकृत किंवा शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षण अहवालानुसार पिक परत्वे कृषी निविष्ठा चे नियोजन करावे. • शेतकरी बांधवांनीशिफारशीतील बियाणे व बीजप्रक्रियेसाठी साठी लागणारी बुरशीनाशके आणि जीवाणू खताची उपलब्धतता करून ठेवावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांच्या धोक्याची पूर्वसूचना प्राप्त करण्यासाठी दामिनी (Damini-LightningAlert) हे मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअर वरून डाउनलोड करून वापर करावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • कपाशीची पेरणी जून महिन्यात मान्सूनचा ७५ ते १०० मिमी पाऊस पडल्यानंतरच करावी. • कोरडवाहू पेरणीसाठी कमी ते मध्यम कालावधीच्या बीटी/नॉन बीटी वाणांचा वापर करावा तर बागायती पेरणीसाठी मधयम उशिरा येणारे किंवा उशिरा पक्व होणारे वाण निवडावे. • गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित करण्यासाठी मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेल्या शेतात पीक न घेता त्या ठिकाणी पिक फेरपालट करावी. • कापूस हे गुलाबी बोंडअळीचे एकमेव यजमान खाद्य वनस्पती आहे, म्हणून पीक फेरपालट केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते. • रोग प्रवण शेतात मातीजन्य रोग आणि सूत्रकृमीचा निरीक्षणासाठी पीक फेरपालट खूप प्रभावी आहे. • बियाण्यांपासून होणाऱ्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्झिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस) @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे (मूळ कुज आणि जिवाणूजन्य रोग) किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड (३३३ जी/एल एफएस) @ १.५ मिली प्रती किलो बियाणे किंवा टेट्राकोनाझोल ११.६ % डब्ल्यू/डब्ल्यू (१२.५ % डब्ल्यू/व्ही) एसएल @ १.५ मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियाणेजण्य रोगाच्या (मूळ कुज रोग) व्यवस्थापनासाठी बीजप्रक्रिया करावी. • नत्र स्थिरीकरणासाठी अझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळण्यासाठी स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी) २० ते २५ ग्राम प्रती किलो बियाणे प्रमाणात जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. • कपाशीमध्ये मुग आणि उडीद यासारख्या आंतरपिकाचा (१:१) ओळीत समाविष्ट करावा. • कपाशी पिकामध्ये सुरुवातीच्या अवस्थेत तणांचे नियंत्रण करण्यासाठी उगवण पूर्व तननाशक पेंडीमेथालिन ३८.७ % सीएस @ ७०० मिली २०० लिटर पाणी प्रती एकर या प्रमाणात वापर करावा. • कपाशी लागवडीसाठी शिफारशीतील अंतर (ओळxदोन झाडातील अंतर) व खतांची मात्रा: अनुक्रमे, देशी वाण (६०x१५, ६०x३० सेंमी, ४०:२०:२० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), सुधारित (६०x३० सेंमी, ६०:३०:३० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), कोरडवाहू बीटी संकरीत कपाशीसाठी (९०x४५, ९०x६० सेंमी, ९०:४५:४५ किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर) आणि बागायती बीटी कपाशीसाठी (१२०x३०, १२०x६० सेंमी, १२०:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर). |
| सोयाबीन | • शेतकरी बांधवांनी सोयाबीन लागवडीसाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी वरंबा तंत्रज्ञानाच अवलंब करावा. या पद्धतीमध्ये शेतात पाणी साचून राहणार नाही तसेच पावसाच्या खंड असलेल्या काळात पिक व्यवस्थापन करण्यात मदत होईल. • सोयाबीन पिक उत्पादनात स्थैर्यता टिकून राहण्यासाठी शेताची २ ते ३ वर्षातून एकदा खोल नांगरणी करावी त्यानंतर वखराच्या २ ते ३ आडव्या उभ्या पाळ्या द्याव्यात आणि नंतर सपाट करून घ्यावी. • शेवटच्या वखराच्या पाळी पूर्वी प्रती हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा २.५ टन कोंबडी खत जमिनीत मिसळावे. • जिल्ह्यासाठी शिफारशीत असणारे सोयाबीनचे वाण निवडावे तसेच आवश्यक बियाण्याची उपलब्धता करून ठेवावी. • बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी अपेक्षित रोपांची संख्या साध्य करण्यासाठी बियाण्याची उगवण क्षमता किमान ७० % एवढी असावी. • खते, तणनाशके, बुरशीनाशके आणि बीज प्रक्रियेसाठी लागणारी जीवाणू संवर्धने इत्यादी महत्वाच्या निविष्ठांची उपलब्धता सुनिश्चित करावी. |
| भुईमूग | • खरीप भुईमुग लागवडीकरिता मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, भुसभुशीत, वाळू मिश्रित चिकन माती व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. भुईमुग लागवडीकरिता जमिनीचा १५ ते २० सेंमी चा थर भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी ५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| तूर | • तूर पिक लागवडीकरिता शेतजमीन तयार करावी. तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणे धारकाकडूनच करावी. तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| मुग | • मूग पिकाच्या लागवडीकरिता पिकेव्ही मूग-८८०२, पिकेव्ही ग्रीनगोल्ड (एकेएम ९९११) या वाणाची निवड करावी, |
| उडीद | • उडीद पिकाच्या लागवडीकरिता टीएयु-१, टीएयु-२, पिकेव्ही उडीद-१५ आणि पिकेव्ही ब्लॅकगोल्ड या वाणाची निवड करावी, |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • नवीन संत्रावर्गीय फळ बाग लागवडीसाठी जमिनीची/मातीची योग्यता तपासणे आवश्यक आहे. जमिनीची खोली कमीतकमी १ मीटर असावी परंतु योग्य पद्धतीने खते आणि मशागातीचा अवलंब केल्यास भरघोस उत्पन्न देणाऱ्या फळबागांची लागवड १ मीटर पेक्षा कमी खोली असलेल्या जमिनीमध्ये करता येऊ शकते. फळबाग लागवडीसाठी जमीन हि पाण्याचा चांगला निचरा होणारी, चिकन मातीचे प्रमाण ६० पेक्षा कमी असणारी, सामू ८.३ पेक्षा कमी, मुक्त चुनखडीचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी आणि २ मीटर खाली पाण्याची स्थिर पातळी असलेल्या जमिनीची निवड करावी. • लिंबूवर्गीय फळबाग लागवडीसाठी तयार केलेल्या प्रत्येक खड्ड्यांमध्ये २ भाग जमिचीच्या पृष्ठभागावरील माती, १ भाग वाळू आणि १ भाग चांगले कुजलेले शेणखत मिश्र करून भरून घ्यावेत, त्याचबरोबर, प्रत्येक खड्ड्यात १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १ किलो निंबोळी केक आणि १०० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर टाकावी. • संत्रावर्गीय रोपवाटिका धारकांनी पॉलीथीन पिशव्या भरताना सम प्रमाणात गाळाची माती, शेणखत आणि वाळू एकत्र मिश्र करून भराव्यात.पॉलीथीन पिशव्या मध्ये हवा खेळती राहण्यासाठी व तुंबलेले पाणी बाहेर जाण्यासाठी पिशव्यांना छिद्र पाडावीत. • संत्रावर्गीय फळबागा मध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या दिशेने व दोन ओळीनंतर ३० सेंमी खोल, ३० सेंमी खालची रुंदी व ४५ सेंमी वरची रुंदी या आकाराचे चर खोदावेत. झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहू नये म्हणून आळे व दांड सपाट करून घ्यावेत. |
| संत्रा | • डिंक्या प्रभावित भागाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आतील भागास इजा होणार नाही याची काळजी घेऊन डिंक बाहेर पडतो भाग धारधार चाकूने किंवा पटाशीने खरडून त्या भागावर मेफेनोक्झाम* एमझेड ६८ (५० ग्राम) किंवा फोसेटील एएल (५० ग्राम) १ लिटर पाण्यात मिसळून पेस्ट तयार करून प्रादुर्भाव ग्रस्त भागावर लावावी. ३० दिवसाच्या अंतराने पुन्हा हि पेस्ट लावावी. • संत्र्यावरील मिली बग या किडीच्या नियंत्रणासाठी झाडाभोवतालची जमीन चाळणी करून मोकळी करावी. झाडाच्या खोडाला प्लास्टीकचा पट्टा बुंध्या भोवती गुंडाळावा व त्यावर मोबिल ऑईल किंवा ग्रीस लावावे. मुंग्यांचे वारूळ बगीच्यामधून नष्ट करावे त्यासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी ५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून मुंग्यांचे वारुळात टाकावे. मिली बग च्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी २ मिली किंवा डायमेथोइट २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्यावर फवारणी करावी. |
| संत्रा | • लिंबूवर्गीय (संत्रा, मोसंबी आणि लिंबू) फळबाग लागवडीसाठी नागपूर संत्रा (नागपूर मंडारिन), मोसंबी आणि लिंबू साठी (७५सेमी x ७५ सेमी x ७५ सेमी) आकाराचे खड्डे ६ X ६ मीटर अंतरावर खोदावेत. तसेच खड्ड्यामध्ये पुरेसा सूर्यप्रकाश पडेल याची काळजी घ्यावी. |
| संत्रा | • आच्छादनामुळे मुळे जमिनीतील ओलावा दीर्घ काळ टिकून राहण्यास मदत होते. बास्पोत्सर्जन कमी करण्यासाठी २ % काओलीन ची फवारणी करावी. लहान फळांचा जीवाणूजन्य करप्याचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यसाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कागदी लिंबू | • लिंबाच्या १ ते ४ वर्ष वयाच्या झाडास ११ ते ३५ लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडास ४२ ते ६१ लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे, ८ ते १० वर्ष वयाच्या झाडास ७३ ते १०८ लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे. • लिंबू बागांमध्ये पाऊस आणि गारपिटीमुळे लिंबूवर्गीय कॅन्कर (Citrus canker) मोठ्या प्रमाणात होतो. लिंबू च्या बागेतील प्रादुर्भाव ग्रस्त भागाची छाटणी करावी. १८० ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड आणि ६ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लिन ६० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| कोबी | • मागील आठवड्यातील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मागील आठवड्यातील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| मिरची | • वाढलेले तापमान व ढगाळ हवामान लक्षात घेता, मिरची पिकामध्ये फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. • सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| टोमॅटो | • मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामान परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. बैल व इतर जनावरांकडून सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेदरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. चरण्यासाठी सकाळी किंवा संध्याकळी सोडावे. |
| गाय | • दुभत्या गाईस दररोज ८ किलो वाळलेला चारा + ६ किलो हिरवा चारा आणि १ किलो खुराक द्यावा. खुराक मिश्रण करताना मका, ज्वारी, बाजरी, गव्हाचा कोंडा याचा वापर करावा. खुरकात २० ग्राम प्रती किलो या प्रमाणात मिश्रण मिसळावे. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून व विजांपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • उष्णतेपासून संरक्षण मिळण्यासाठी कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. • बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर |

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
|---|---|
| | तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |

